स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि. २३/०६/२०२६

***राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम'***

आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार *रविवार, दिनांक २८ जून २०२६* रोजी संपूर्ण देशभरात '*राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम'* राबविण्यात येत आहे. या मोहिमे अंतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात ० ते ५ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना पोलिओ प्रतिबंधक लस (दोन थेंब) पाजण्यात येणार आहे.

महानगरपालिका आयुक्त आणि वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका प्रशासनाने या मोहिमेची तयारी केली आहे.

*मोहिमेची ठळक वैशिष्ट्ये आणि नियोजनः*

> *पोलिओ बूथ :* महापालिका क्षेत्रातील सर्व सरकारी रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, अंगणवाड्या, शाळा आणि प्रमुख चौकांमध्ये विशेष पोलिओ बूथ तयार करण्यात आले आहेत. त्यापैकी एकूण ९६६ बूथ आहेत.

> *ट्रान्झिट आणि मोबाईल टीम :* रेल्वे स्टेशन, बस स्थानके, नाके, बांधकाम सुरू असलेल्या जागा आणि गर्दीच्या ठिकाणी प्रवासात असणाऱ्या बालकांसाठी 'ट्रान्झिट टीम' आणि 'मोबाईल टीम' तैनात करण्यात आल्या आहेत. ट्रान्झिट टीम एकूण ९५ आणि मोबाईल टीम एकूण ३२ आहेत.

> *घरोघरी भेट (IPPI) :* २८ जून रोजी बूथवर लस घेण्यापासून वंचित राहिलेल्या बालकांसाठी पुढील ५ दिवस (२९ जून ते ३ जुलै २०२६ महानगरपालिकेमार्फत कर्मचारी घरोघरी जाऊन बालकांना शोधून लस देण्यात येते.

*वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत आवाहन :*

"पोलिओचे भारतातून समूळ उच्चाटन झाले असले तरी, शेजारील देशांमध्ये अद्यापही पोलिओचे विषाणू सक्रिय आहेत. त्यामुळे आपल्या बालकांचे सुरक्षा कवच कायम ठेवण्यासाठी ही मोहीम अत्यंत महत्त्वाची आहे. यापूर्वी बालकाला पोलिओचे डोस दिलेले असले, तरीही २८ जून रोजी पुन्हा दोन थेंब पाजणे आवश्यक आहे." तसेच महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरिकांना, पालकांना आणि स्वयंसेवी संस्थांना आवाहन करण्यात येते की, आपल्या परिसरातील ० ते ५ वर्षे वयोगटातील एकही बालक पोलिओ लसीकरणापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी आणि मोहिमेला सहकार्य करावे.

"*दोन थेंब प्रत्येक वेळी, पोलिओवर विजय कायम !"*

वैद्यकीय आरोग्य विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका